# प्रेस नोट २८/०५/२०२०

## पोलीस कस्टडीमधुन पळालेल्या आरोपीस अटक

### पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

वाकड पोलीस स्टेशन कडील गु.रजि.नं. ४५९/२०२० भादवि कलम ३२५,३४ या गुन्ह्यातील अटक आरोपी **कृष्णा उत्तम सोनवणे, वय १९ वर्षे, रा. तापकीर मळा, चर्च जवळ, काळेवाडी, पुणे** व इतर दोन आरोपी यांना दि.२६/०५/२०२० रोजी वैद्यकिय तपाराणी करणे कामी पोलीस स्टाफसह वाय.सी.एम. हॉस्पीटल येथे नेले असताना गर्दीचा व संधीचा फायदा घेवुन तो पोलीसांना गुंगारा देवुन पळून गेला होता. सदर आरोपीचा शोध घेणे बाबत वाकड पोलीस स्टेशनचे वपोनि यांनी वपोनि उत्तम तांगडे यांना व्हॉट्सअप व फोनव्दारे माहिती सांगुन कळविले होते.

वपोनि उत्तम तांगडे यांनी गुन्हे शाखा, युनिट १ कडील सपोनि गणेश पाटील व पो.शि.गणेश सावंत यांचेशी फोनव्दारे संपर्क साधुन सदरचा आरोपी हा भोसरी, एम.आय.डी.सी. भोसरी, चिखली, दिघी परीसरात पळुन गेला असल्याची शक्यता असुन त्याचा शोध घेणे बाबत सांगुन आरोपीचा फोटो व माहिती व्हॉट्सअपवर पाठवुन तत्काळ रवाना होण्यास सांगितले. युनिट १ चे पो.शि.गणेश सावंत यांनीआरोपीची माहिती त्याचे बातमीदाराचे व्हॉट्सअप गृपवर टाकली व त्यांना संपर्क करून त्वरीत परिसरात माहिती घेण्यास सांगितले. गृपमधिल एकाने गणेश सावंत यास फोन करून फोटोतील वर्णनाचा इसम हा दिघी येथील साई मंदिराचे पाठीमागील परीसरामध्ये पळत येत असताना दिसला असल्याचे कळविले.त्यानुसार सपोनि गणेश पाटील, पोउनि काळुराम लांडे पोलीस कर्मचारी सचिन उगले, नितीन खेसे, गणेश सावंत, विजय मोरे यांचे पथकाने दिघी येथील साईमंदिराचे पाठीमागील परीसरामध्ये ट्रॅप लावुन एका संशयीत व फोटोसारख्या दिसणाऱ्या इसमास मोठ्या सिताफीने सांय ६.३० वा.पकडले. त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याने नाव **कृष्णा उत्तम सोनवणे** असे असल्याचे सांगितले. लागलीच त्याचा फोटो काढुन तो वाकड पोलीस स्टेशन येथील कर्मचारी यांना पाठवुन त्याची खात्री केली. आरोपीकडे अधिक चौकशी करून पुढील कारवाई कामी वाकड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अपार पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ चे वपोनि उत्तम तांगडे, सपोनि गणेश पाटील, पोउनि काळुराम लांडे पोलीस कर्मचारी सचिन उगले, नितीन खेसे, गणेश सावंत, विजय मोरे यांचे पथकाने केली आहे.

CS Scanned with CamScanner

Scanned with CamScanner